**राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत अल्पसंख्याक समाजाच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांचे आधुनिकीकरणासाठी १० टक्के भांडवली अनुदान वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पुरक-२०२५/प्र.क्र.१५२/टेक्स-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २८ मार्च, २०२६.

वाचा:-
१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-२, दि.०१ मार्च २०१२.
२) शासन शुद्धीपत्रक दिनांक १२ मार्च २०१२ आणि दि. १५ जुलै, २०१२.
३) शासन परिपत्रक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/प्र.१७८/टेक्स-२, दि.१३ ऑगस्ट २०१२.
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग धोरण २०१२/प्र.२५०/-२, दि. २१ फेब्रुवारी, २०१४.
५) वित्त विभाग, परीपत्रक २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/०४/२०१५.
६) शासन परीपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण-२०१६/प्र.क्र. ३१/कोमा प्रशा-५, दि. १० मे २०१६.
७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक संकिर्ण-२०१०/प्र.क्र.१००/टेक्स-५ दि. ०४ डिसेंबर २०१९.
८) शासन निर्णय, सहकार, पणन व योग विभाग क्रमाक बैठक २०१२/प्र.क्र. १५९९/ टेक्स-५ दि. १९ मार्च २०२०.
९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७ एप्रिल, २०२५.
१०) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०१/टेक्स-५, दि.२६ जून, २०२५.
११) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-१९२५/(प्र.क्र.६४/२०२५)/१७-स, दि.०७ जानेवारी, २०२६.
१२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.२९ जानेवारी, २०२६.
१३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३७९/टेक्स-५, दि.३१ मार्च, २०२३.

**प्रस्तावना -**

वरील संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण, २०११-१७ अंतर्गत अल्पसंख्याक समाजाच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांचे आधुनिकीकरणासाठी १० टक्के भांडवली अनुदान योजना जाहीर केली आहे. त्यानुसार वस्त्रोद्योग धोरणांतर्गत अल्पसंख्याक समाजाच्या वस्त्रोद्योग घटकांना १० टक्के भांडवली अनुदान योजना या योजने अंतर्गत उर्वरित १४ प्रस्तावांना सन २०२५-२६ मध्ये वित्त विभागाने पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीनुसार या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्टा" मधील विवरणपत्रानुसार अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये सचिव/प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीच्या बैठकीत मंजूरीप्राप्त प्रकल्पांना त्यांच्या अनुदान रकमेच्या प्रमाणात सन २०२५-२६ मध्ये वित्त विभागाने या योजनेसाठी पूरक मागणीव्दारे खर्चाकरीता उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीमधून या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट अ" मधील विवरणपत्रानुसार एकूण रु.६२,४९,०००/- (अक्षरी रुपये बासष्ट लाख एकोणपन्नास हजार) इतकी रक्कम मंजूर करुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कम संदर्भ क्र. १० येथील शासन निर्णयान्वये गठीत दक्षता व नियंत्रण पथकाच्या तपासणीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे. ज्या प्रकल्पांची तपासणी दक्षता व नियंत्रण पथकाकडून झाली नसेल त्यांची तपासणी लवकर करण्यात येईल.

२. सदरहू वस्त्रोद्योग घटकांना वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या बँकांच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे वितरीत करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली भांडवली अनुदानाची रक्कम संबंधित बँकांनी या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टा मधील त्यांच्याशी संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या कर्ज खात्यात जमा करून याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेबसाइटवर ऑनलाईन सादर करावे.

४. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्री.सु.पु.पांगारकर, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. श्रीकृष्ण पवार, उप सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई, (V०००९) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून VPDA क्र. ७१०१०७००३६ या खात्यावर आहरीत करुन ती सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या बँकांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. यावर होणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) (६८) राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत अल्पसंख्याक समाजाच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांचे आधुनिकीकरणासाठी १० टक्के भांडवली अनुदान (२८५१ ६०४६) (कार्यक्रम), ३३, अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली सन २०२५ -२६ या वित्तीय वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक- अर्थसं -२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ या परीपत्रकातील तसेच त्यासोबतच्या तपासणी सुचीतील लागू असलेल्या सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

७. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकिर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा. प्रशा-५, दि.१०.०५.२०१६ च्या (परिशिष्ट-अ मधील अनु. क्र. १ ते ९ संदर्भातील तपासणी सुची मधील याप्रकरणी लागू असलेल्या मुद्द्यांची पुर्तता होत आहे. सदर परीपत्रकानुसार परिशिष्ट-अ मधील अनु. क्र. १ ते ९ संदर्भातील माहीती खालील प्रमाणे आहेः-

(१) विभागास प्रदान वित्तीय अधिकारः वित्त विभाग परीपत्रक क्र. अर्थस २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/४/२०१५ अन्वये ३३ अर्थसहाय्य या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परीपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पुर्तता होत आहे.

(२) मंजूर निधी:- यावर होणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) (६८) राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणा अंतर्गत अल्पसंख्यक समाजाच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांचे आधुनिकीकरणासाठी १० टक्के भांडवली अनुदान (२८५१ ६०४६) (कार्यक्रम), ३३, अर्थसहाय्य, या लेखाशिर्षाखाली वित्त विभागाने रू.६२.४९ लाख निधी पूरक मागणीव्दारे खर्च करण्यास उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधी प्रस्तूत शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत आहे.

(३) मागील ३ महिन्यापूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे:- या योजनेखाली चालू आर्थिक वर्षात कोणताही निधी खर्च करण्यात आलेला नाही.

(४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यात येत आहे. त्या लेखाशिर्षाअंतर्गत १ वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही:- या योजनेखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देताना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यात आली आहे:- या योजनेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्यात येत नसल्याने सदर बाब या प्रकरणी लागू होत नाही.

(६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे लागू:- या योजनेखाली वैयक्तिक लाभार्थीचे देयक देण्यात येत नसल्याने सदर बाब या प्रकरणी लागू नाही.

(७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा:- या योजनेखाली बांधकाम विषयक प्रस्ताव नसल्याने सदर बाब या प्रकरणी लागू होत नाही.

(८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यापुर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत:- या योजनेखाली अधिनस्त कार्यालयांना खरेदी विषयक प्रस्ताव नसल्याने सदर बाब या प्रकरणी लागू होत नाही.

(९) खरेदी विषयक प्रक्रीया अद्यावत संबंधीत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा:- या योजनेखाली खरेदी विषयक प्रस्ताव नसल्याने सदर बाब या प्रकरणी लागू नाही.

८. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ. क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये सचिव/प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या विविध बैठकीत वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या दाव्यांना मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने तसेच वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.अनौसं १२२/२०२६/व्यय-२, दि.१६/०२/२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून वितरीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२८१७२७१०८५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAMOD GANPATRAO PAWAR

Digitally signed by PRAMOD GANPATRAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=ba1df963775f8ead7f10c7f6fad8e2573f437f35d4b00e09a9b9c0ccdbf0d42a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5D6B51FDDC1FD566C46A6440D68EF83795379225572F777B66113D5833F98B04, cn=PRAMOD GANPATRAO PAWAR
Date: 2026.03.28 17:28:01 +05'30'

**(प्रमोद पवार)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. अ.मु.स., वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. प्रधान सचिव, (नियोजन विभाग), मंत्रालय मुंबई.
४. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर.
७. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१०.नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई.

११.वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.

१२.अवर सचिव (१७-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३.कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती ),सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४.परिशिष्टामधील बँका (टफ सेल).

१५.निवड नस्ती, कार्यासन टेक्स-५.

परिशिष्ट "अ"

शासन निर्णय दि. २८/०३/२०२६ सोबतचे परिशिष्ठ

| अ.क्र. | युआयडी | प्रकल्पाचे नाव | अनुदान (रु.लाखात) | बँकेचे नाव | एकुण बँक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S/2016/2742 | M/S. SHREE SILK MILLS | 5.17 | Bank of Maharashtra | |
| 2 | S/2016/2757 | M/S DEEPAN FABRICS | 5.41 | Bank of Maharashtra | |
| 3 | S/2016/10009 | M/S. MAAN FABRICS | 5.27 | Bank of Maharashtra | |
| 4 | S/2016/10035 | M/S, LIZA TEXTILES | 3.23 | Bank of Maharashtra | |
| | | | | | 19.08 |
| 5 | D/2016/10578 | RONAK TEXTILES | 4.68 | Bharat cooperative bank | |
| 6 | D/2016/10577 | MAHAN SYNTHETICS | 4.68 | Bharat cooperative bank | |
| | | | | | 9.36 |
| 7 | D/2016/10073 | ADINATH ENTERPRISES | 4.74 | Corporation Bank Corporation Bank (Merged in Union Bank of India) | |
| 8 | D/2015/10050 | DJ Textiles | 5.13 | Corporation Bank Corporation Bank (Merged in Union Bank of India) | |
| | | | | | 9.87 |
| 9 | S/2015/10060 | SANJAY SILK INDUSTRIES | 5.45 | Dombivili Nagari Sahakari Bank Ltd. | |
| 10 | S/2014/10116 | LALIT SILK MILLS | 5.05 | Dombivili Nagari Sahakari Bank Ltd. | |
| | | | | | 10.5 |
| 11 | S/2016/2760 | JAIN SYNTHETICS | 1.21 | Syndicate Bank (Syndicate Bank Merge in canara bank) | |
| | | | | | 1.21 |
| 12 | S/2014/10067 | M/S. ANIL SILK MILLS | 2.95 | The Cosmos Co-operative Bank Ltd | |
| 13 | D/2016/10449 | M/S. IT'S CREATION | 4.91 | The Cosmos Co-operative Bank Ltd | |
| 14 | S/2016/2619 | M/S. IT'S CREATION | 4.61 | The Cosmos Co-operative Bank Ltd | |
| | | | | | 12.47 |
| | | | 62.49 | | 62.49 |

Bank Details

| Sr.No | 1 | Bank Name | Bank of Maharashtra |
|---|---|---|---|
| Account Name | Tufs Subsidy Maharashtra | Account Number | 60124514747 |
| IFSC Code | MAHB0000002 | | |

| Sr.No. | 2 | Bank Name | Bharat cooperative bank |
|---|---|---|---|
| Account Name | TUFS SUBSIDY AND INTEREST PAYABLE MAHARASHTRA | Account Number | 00000171000019 |
| IFSC Code | BCBM0000002 | | |

| Sr.No | 3 | Bank Name | Union Bank of India |
|---|---|---|---|
| Account Name | MAHARASHTRA TUFS INT REIMBURSMENT | Account Number | 378901010036988 |
| IFSC Code | UBIN0580210 | | |

| Sr.No. | 4 | Bank Name | Dombivali Nagari sahakari Bank |
|---|---|---|---|
| Account Name | STATE SUBSIDY | Account Number | 000000000001001 |
| IFSC Code | DNSB00000CO | | |

| Sr.No | 5 | Bank Name | Canara Bank (RTGS) |
|---|---|---|---|
| Account Name | SL-OL-RTGS-NEFT PMT ENS 0 | Account Number | 209272434 |
| IFSC Code | CNRB0001879 | | |

| Sr.No | 6 | The Cosmos Co-operative bank Ltd. | The Cosmos Co-operative bank Ltd. |
|---|---|---|---|
| Account Name | Interest subsidy received under TUFS | Account Number | 025370092 |
| IFSC Code | COSB0000012 | | |

**Total Subsidy Amount Rs.62.49 Lakhs**